● रविवार, दि. १९ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १७२ वा ● किमंत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282



## शोभायात्रेत श्रद्धेचा महासागर; रस्त्यावर अवतरले गोकुळ!

### सजीव झांकी, घोडेस्वार, उंटस्वार, शाहिरी पथक, लेझीम, दांडिया, बाल वारकरी आणि मंगल वाद्यांने आसमंत निनादला

**जालना । प्रतिनिधी -** गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या श्रीमद्भागवत कथा महोत्सवासाठी आज शनिवार दि. १८ जानेवारी रोजी बडी सडक येथील श्रीराम मंदिरासमोरून करण्यात आलेल्या शोभायात्रेने भक्ती आणि श्रद्धेचे अनुपम दर्शन घडवले. शोभायात्रेचा ठिकठिकाणी भव्य स्वागत कमानींनी सजवलेला मार्ग, पुष्पवृष्टी, रांगोळ्यांनी सुशोभित केलेले रस्ते आणि मंगल वाद्यांमुळे संपूर्ण शहर मंगलमय झाले होते. याची देही याची डोळा, याप्रमाणे ही शोभायात्रा ऐतिहासिक ठरली.

शोभायात्रेची सुरुवात प. पू. राधाकृष्ण महाराज आणि मुख्य यजमान शिवरतन मुंदडा यांच्याहस्ते रामलल्लांच्या आरतीने झाली. सर्वात समोर कलशधारी महिला, त्यानंतर गोवत्स प. पू. राधाकृष्ण महाराज विराजमान असलेला रथ, सजीव झांकींचे २० रथ, उंटस्वार, घोडेस्वार, शाहिरी पथके, बाल वारकरी, लेझीम व दांडिया पथक, केरळी बँड, सजीव झांकींनी भक्तांच्या मनात अध्यात्मिक जिवंतपणा निर्माण केला. मंगल वाद्यांच्या निनादाने संपूर्ण शोभायात्रा भक्तिरसाने ओतप्रोत भरली होती. बडी सडक, नरिमान रोड, राजुरी कॉर्नर, संभाजीनगर आणि मुंडे चौक मार्गे ब्रजधामपर्यंत निघालेली शोभायात्रा भक्तीचा महोत्सव ठरली. शोभायात्रेत दर्शनासाठी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या भाविकांच्या जय श्रीकृष्ण आणि हरि बोल च्या जयघोषाने आसमंत दुमदुमला. ठिकठिकाणी करण्यात येत असलेली पुष्पवृष्टी, भक्तांचा उत्साह आणि झांकींनी जालनेकरांच्या अंत:करणाला स्पर्श केला.

शोभायात्रेत भक्तीबरोबर सेवाभावाचा संगम दिसून आला. शोभायात्रा मार्गावर ठिकठिकाणी फराळ, चहा-पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. शोभायात्रेत प्रतिष्ठित मंडळी, राजकीय मंडळी, सर्व क्षेत्रातील मान्यवर, भाविक, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शोभायात्रेच्या निमित्ताने जालन्याच्या गल्लीबोळांत भक्तीचा मंगल गजर झाला. रथ, झांक्या आणि वाद्यांच्या गजरातील शोभायात्रेचे अनोखे रूप जालनेकरांनी अनुभवले. दररोज दुपारी १ ते सायंकाळी ५ या वेळेत राधाकृष्ण महाराजांची कथा होणार आहे.

श्रीमद् भागवत कथेचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती आणि सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.





युवा आदर्श

**कागदी पाहुणे ...**

घरी माझ्या येणारे
लांबडी चौडी यादी
सरता सरेना वर्दळ
सारखी दाटते गर्दी
फ्लिपकार्ट अमेझॉन
कुणीही येतात कधी
दूधवाला पेपरवाला
हजेरी लावतो आधी
घेऊन जाई भरभरू
भंगार पेपर अन् रद्दी
हटकून भेटाया येती
फेरीवाले अति जिद्दी
रोज हेलपाटे मारती
स्विगी झोमॅटो आदि
स्कीम काढू नवनवी
सतत लावतात नादी
ऑनलाईन शॉपींगचे
ओळखीचे रे अगदी
आगंतुक भाव शून्य
व्यवहार असे कागदी
झाडूवाले कामवाली
रोजची ठरलेली वर्दी
माहीत नाही रे परंतु
पै पाहुणे आले कधी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## मौजमजेवरील अनाठायी उधळपट्टी म्हणजे कष्ट व लक्ष्मीचा अपमान- प. पू. राधाकृष्णजी महाराज

### जालन्यात ब्रजधाममध्ये श्रीमद् भागवत कथेच्या पहिल्याच दिवशी भक्तांचा महासागर उसळला





**जालना । प्रतिनिधी -** विवाह समारंभ, मनोरंजन, संततीच्या मौजमजेवरील अनाठायी पैशांची उधळपट्टी म्हणजे ते कमवण्यासाठी आपण केलेले कष्ट आणि लक्ष्मीचा अपमान आहे. ही उधळपट्टी करताना त्यासाठी आपणास किती कष्ट घ्यावे लागले, याचा विचार करा. इतरांना मोठेपणा दाखविण्याच्या नादात लक्ष्मीचा अनादर करू नका, असा सल्ला गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज भागवत कथेदरम्यान उपस्थित त्यांना दिला.

श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरातील नवा मोंढा रोडवर ब्रजधाममध्ये १८ ते २४ जानेवारीदरम्यान आयोजित श्रीमद् भागवत कथा महोत्सवाला आज शनिवार दि. १८ जानेवारी रोजी प्रारंभ झाला. भव्यदिव्य शोभायात्रेनंतर दुपारी २ वाजता मुख्य यजमान शिवरतन मुंदडा आणि दैनिक यजमानांच्या हस्ते ग्रंथ पुजनाने कथेला सुरुवात झाली. कथेच्या प्रारंभी प. पू. राधाकृष्णजी महाराज यांनी कथा संयोजन समितीच्या नियोजनाचे कौतुक करून, शोभायात्रेला लोटलेल्या भक्तांच्या महासागराच्या अनुषंगाने बोलताना ही भागवत कथेची शोभायात्रा नव्हे तर ठाकूरजींची बारात असल्याची अनुभूती आल्याचे सांगितले. कथा आणि शोभायात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांमुळे पहिल्याच दिवशी संयोजकांनी महोत्सवाला सफल बनविले. कथा महोत्सव समितीबरोबरच सनातन हिंदू समाजही संयोजन समितीत असल्याचा आपणास सार्थ अभिमान असून, प्रत्येक सनाततीने दररोज कथेला येता नाही आले तरी किमान एक दिवस मंडपात येऊन दर्शनाचा लाभ घ्यावा, अशी साद त्यांनी घातली. या ठिकाणी दररोज सकाळी गोपूजन होणार आहे. गोपूजनाने साक्षात जगतजननी जगदंबेचे दर्शनाचा लाभ होतो, असे सांगून ते म्हणाले की, सध्या कलयुग सुरू आहे. कुणी कुणाचे ऐकायला तयार नाही, नातेसंबंध जोपासायला तयार नाहीत. काही अप्रिय घडल्यास, कलियुग आहे? असे म्हटले जाते. कलियुगाला ना कोणता देव नष्ट करू शकतो ना, या कलियुगाला पळवून लावता येते. परंतु, काही उपायांमुळे कलयुगापासून सुटका करून घेता येते. जेथे नित्य कथा होते, कथा ऐकण्यासाठी भाविक तेथे बसतात, जिथे भगवान श्रीकृष्णाची नित्यसेवा केली जाते, श्रीकृष्णाला दररोज शृंगार, तुळशीपत्र अर्पण आणि नैवेद्य दाखविला जातो, तेथे कलियुगाचा अधिकार चालत नाही म्हणजेच कलियुगाचा प्रभाव त्यांच्यावर पडत नाही, हे त्यांनी विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट करून सांगितले. खऱ्या **पान २ वर**

### युत्युबवर कथेचे थेट प्रक्षेपण; आज रात्री भजन महोत्सव

१९ जानेवारीला रात्री आठ वाजता कथास्थळी वृंदावन धामचे पूज्य इंद्रेश महाराज यांचा भजन महोत्सव तर २२ जानेवारीला निकुंज कामरा आणि आरुषी गंभीर यांची भजन संध्या भाविकांच्या मनाला भक्तिरसाने भिजवणार आहे. युत्युबवरून श्रीमद् भागवत कथेचे थेट प्रक्षेपण केले जात असून, ज्यांना कथास्थळी येणे शक्य नाही अशांना आणि देश-विदेशातील भाविकांना या दिव्य महोत्सवाचा लाभ घेता येईल. दररोज गोपूजन व तुलादान, पहाटे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या उपस्थितीत संभाजीनगर प्रभागातील श्री बालाजी मंदिर येथून विविध भागात प्रभात फेरी निघणार आहे.

## जालन्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे




**मुंबई -** राज्य सरकाकडून पालकमंत्र्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे. गडचिरोलीचे पालकमंत्रीपद हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असून ठाणे व मुंबई शहराचे पालकमंत्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पुणे व बीडचे पालकमंत्री उपमुख्यमंत्री अजित पवार आहेत. जालन्याच्या पालकमंत्री पदाची जबाबदारी ही पंकजा मुंडे यांच्याकडे देण्यात आली आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून पालकमंत्रीपदाचा मुद्दा चर्चेत आला होता. विशेष म्हणजे मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव पालकमंत्र्यांच्या यादीत नसल्याने त्यांचा पत्ता कट करण्यात आला आहे. संजय सिरसाट यांच्याकडे छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. जालन्याचे पालकमंत्री राहिलेले अतुल सावे यांच्याकडे नांदेडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

**पालकमंत्रीपदाची यादी पुढीलप्रमाणे....**

गडचिरोली - देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस, मुख्यमंत्री
गडचिरोली - ॲड. आशिष उमादेवी नंदकिशोर जयस्वाल (सह-पालकमंत्री)
ठाणे - एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, उपमुख्यमंत्री
मुंबई शहर - एकनाथ गंगुबाई संभाजी शिंदे, उपमुख्यमंत्री
पुणे - अजित आशाताई अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री
बीड - अजित आशाताई अनंतराव पवार, उपमुख्यमंत्री
जालना - श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे
नागपूर - चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे
अमरावती - चंद्रशेखर प्रभावती कृष्णराव बावनकुळे
अहिल्यानगर- राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे-पाटील
वाशिम - हसन सकिना मियालाल मुश्रीफ
सांगली - चंद्रकांत (दादा) सरस्वती बच्चु पाटील
नाशिक - गिरीश गीता दत्तात्रय महाजन **पान २ वर**

### टेंभुर्णीच्या गांवपणाला लागली कोणाची नजर

# गेले तलाठी कार्यालय गेले बाहेर; पुर्वीच्या ठिकाणी सुरु करण्याची मागणी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील सजा तलाठी कार्यालय बाहेर गेल्या मुळे टेंभुर्णी परिसरातील बरेच शेतकरी अडचणीत आल्याचे दिसत आहे. टेंभुर्णी येथील जुने मुख्य बसस्थानक जवळील महादेव मंदिर जवळ असलेले टेंभुर्णी सजाचे तलाठी कार्यालय हे गावच्या बाहेर गेले आहे. त्या ठिकाणी कुलूप लागलेले असल्याने शेतकरी यांची मोठी अडचण होत असल्याचे दिसून येत आहे. येथील कार्यालय कुठे गेले यांची कसलीही माहिती येथे लिहून ठेवली अथवा सूचना नाही हे विशेष.

नेहमी रहदारी आलेल्या ठिकाणी हे ऑफिस नसल्याने येथील हॉटेल व्यवसायिक जनरल स्टोर छोट्या व्यापारी बंधू वर त्यांच्या व्यवसायावर होणाऱ्या परिणामांचे भीती वाढली असून त्यांची ही अडचण वाढली आहे. असे मत येथील व्यापारी सदस्य यांनी मांडली. या बाबत माहिती घेतली असल्यास येथील तलाठी राम धनेश यांनी दिलेल्या माहिती नुसार त्यांच्याकडे कुंभारझरी या गावाचा वाढीव काम आल्याने हे ऑफिस दोन्ही गावाच्या कामासाठी वरील ग्रामपंचायत




कार्यालयजवळ वडा खाली असून, गावातील जुने गांधी चमन, भांजी मंडी येथील ठिकाणी सगळे ऑफिस येणार असून या बाबतच्या कामाची पाहणी झाली असून त्यांची ऑर्डर ही तयार असून येथील मोकळ्या मैदानात हे नवीन कार्यालय लवकर सुरू होणार असल्याची माहिती तलाठी राम धनेश यांनी दिली. मात्र या कामासाठी अजून किती दिवस किती वेळ लागेल हे मात्र त्यांनी सांगितले नाही.

टेंभुर्णीचे मुख्य बस स्थानक हे नेहमी रहदारीचे असलेले ठिकाण आहे.गावात बस येत नाही म्हणून आधीच गाव भयाण झाले असून तलाठी कार्यालय असल्याने कसंतरी शेतकरी मंडळी एकत्र येत होती. मात्र ते वर गेल्याने गावाचे गावंपण गायब झाले असून या कार्यालयासह इतर कार्यालय ही गावात येण्याची गरज असल्याची प्रतिक्रिया व्यापारी विशाल झोरे यांनी दिली.

# राष्ट्रीय शिक्षण धोरण हे एकविसाव्या शतकातील क्रांतिकारी - डॉ के. एस. पाटील

राष्ट्रीय शिक्षण धोरण हे २१ व्या शतकातील क्रांतिकारी - डॉ के. एस. पाटील

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** राष्ट्रीय शिक्षण धोरण हे रोजगारभीमुख, बहुआयामी, कौशल्यधिष्ठित, विध्यार्थीकेंद्रित आणि २१ व्या शतकातील एक क्रांतिकारी धोरण आहे. म्हणून प्रस्तुत लवचिक,सर्वसमावेशक, भारतीय ज्ञान परंपरा आधारित शैक्षणिक धोरणाचा आपण स्वीकार करण्यासाठी तयारी दाखवणे आवश्यक आहे असे मत कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक सिद्धार्थ महाविद्यालयातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. के. एस. पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या निर्णयानुसार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या परिपत्रकानुसार राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०- स्कुल कनेक्ट संपर्क अभियान कार्यक्रम भाग -२ चे सिद्धार्थ महाविद्यालय जाफ्राबाद येथे दि. १५ जानेवारी रोजी यशस्वीरित्या आयोजन करण्यात आले होते.

महाराष्ट्रात शै. वर्ष २०२३-२४ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी पदवी आणि पदवीत्तर स्तरावर सुरु झाली. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर याची योग्य अंमलबजावणी व विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी हा उद्देश प्रस्तुत अभियानाचा होता.

सिद्धार्थ महाविद्यालयाच्या वतीने शहरातील सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालय, समर्थ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय, ज्ञानसागर माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय येथे संपर्क अभियान राबवून विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली.




स्कुल कनेक्ट संपर्क अभियानाचा समारोप करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात राष्ट्रीय शिक्षण धोरण हे भारताला ज्ञान महासत्ता बनवण्यासाठी उपयुक्त असून देशासाठी दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन केले.

प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. विनोद हिवराळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संजय पाटील यांनी केले तर आभार आय. क्यू. ऐ. सी समन्वयक डॉ. कस्तुरे यांनी मानले.उप प्राचार्य प्रो. सुनिल मेढे, प्रा. अनील वैद्य,तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.


# गोर गरीबांना उबदार चादर वाटप करत केला मुलाचा वाढदिवस साजरा



**परतूर । प्रतिनिधी -** समाजात वावरत असतांना वाढदिवस म्हणजे शो शा, पार्ष्या, इव्हेंट, फटाक्यांची आतिषबाजी, ढोल ताशे,कर्कश आवाजात वाजणारे डिजे हा जणू आज काळ फॅशनच झाल्याचे दिसून येत आहे आणि यावर होणारा अफाट खर्च आपण नेहमीच पाहत असतो.पण याला अपवाद आहे कणसे कुटुंबीय मागील अनेक वर्षापासून आपल्या घरातील व्यक्तीचा वाढदिवस कोणत्या ना कोणत्या उपक्रमाने साजरा करतात. दिनांक १७ जानेवारी रोजी भाजपचे तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे यांचा मुलगा जयेशचा वाढदिवस म्हणून त्यांनी शहरातील गोर गरीब कुटुंबांना उबदार चादरी वाटप करून साजरा केला. सद्या कडाक्याची थंडी पडत आहे यामुळे गोर गरीब, भिक्षू लोकांची अनास्था पाहून त्यांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी निर्णय घेतला की मुलाचा वाढदिवस हा कोणत्या हॉटेलमध्ये किंवा मोठ्या रेस्टॉरंट मध्ये न करता गोर गरीबांना चादरी वाटप करूनच करायचंआणि प्रत्येक्षात त्यांनी रेल्वे स्थानकावरील बेवारस, अनाथ, भिक्षू अश्या लोकांना ब्लॅकेट (चादरी) वाटप करून एक अनोखा उपक्रम राबविला असल्याने शहरासह तालुक्यात कणसे कुटुंबीयांचे अभिनंदन, कौतुक केले जात आहे.वाढदिवस साजरा करतांना आपण आपल्या अवती भवती असलेल्या गोर गरीब लोकांचा विचार करूनच साजरा करावा सोबतच गोर गरीब लोकांना आपल्या माध्यमातून फुल नव्हे फुलाची पाकळी भेट म्हणून द्यावी कारण परमेश्वर तुमच्या कार्याची दखल नक्कीच घेत असतो म्हणून मुलाचा वाढदिवस साजरा करतांना आमच्या कुटुंबीयांनी घेतलेल्या निर्णयाला माझा नेहमीच पाठिंबा असतो तसेच गोर गरीबांना मदत करून मनाला आनंद भेटला असल्याची प्रतिक्रिया भाजपा तालुकाध्यक्ष शत्रुघ्न कणसे पाटील यांनी बोलतांना दिली.

## सोशल मीडियाचा काळजीपूर्वक वापर करा - सहापोनि सचिन खामगळ

**टेंभूर्णी । प्रतिनिधी -** सोशल मीडियाच्या काळजीपूर्वक वापर करावा गुन्हा होण्यासारखे प्रकार घडणार नाही याची काळजी घ्यावी असे आव्हान टेंभुर्णी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन खामगळ यांनी केले आहे जाफाबाद तालुक्यातील टेंभुर्णी सह ग्रामीण भागातील नागरिक युवक व उच्च शिक्षक घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सोशल मीडियावरील इतर घटनेचा काळजीपूर्वक वापर करावा असे आवाहन यांनी केले आहे दोन समाजात तेढ निर्माण होईल तसेच सोशल मिडियावरील पोस्टमुळे इतर कोणत्याही व्यक्तींना त्यापासून त्रास होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी टेंभुर्णी पोलीस स्टेशन हद्दीत वारंवार याबाबत जनजागृती करण्यात येत आहे तरीही काही नागरिक याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे काल एका जणांनी सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याने त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेषता तरुणांनी सोशल मीडियाचा जपून वापर करावा. तरुणांनी सोशल मीडियाचा, इंटरनेटचा समाज विकासासाठी वापर करताना



आपल्या हातून कोणत्या प्रकारची चुकीची माहिती पुढे जाणार नाही याची दक्षता घ्यावी. आज सोशल मीडियाचा वापर जास्त प्रमाणात होत असताना ही काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सोशल मीडिया इन्फॉर्मेशन साठी असते. त्यातून वेगळ्या प्रकारचा मेसेज जाईल अशा कोणत्या कृती करू नये. सोशल मीडियातून चांगलेच मेसेज येतील याची काळजी घ्यावी.

पान १ वरुन

## मौजमजेवरील अनाठायी ...

अर्थाने आपले हृदयच पंढरपूर आहे, मनही पंढरपूर आहे आणि या मनरूपी पंढरपूरचा राजा पंढरीनाथ आहे. आपल्या हृदयात भक्तीने भगवान श्रीकृष्ण एकदा विराजमान झाल्यास क्रोध, मत्सरानेदेखील दूर होऊ शकत नाहीत, असे ते म्हणाले.

भागवत कथेचे महत्व विशद करताना, गंगेच्या तीरावर महर्षी नारद मुनी यांनी भागवत कथेचे आयोजन केले होते. त्यावेळी श्रीकृष्ण प्रकट झाले होते. श्रीकृष्णांनी नारदजींना विचारले तुम्हाला काय पाहिजे ते मागा. त्यावर जिथे भागवत कथा असेल तेथे तुम्ही प्रकट व्हाल, असा वर मागितला. श्रीकृष्णांनी तथास्तु म्हणून जिथे भागवत कथा होईल तेथे मी प्रकट होईल असे सांगितले आणि ते प्रकट होतात. भागवत हा सर्व ग्रंथांचे आणि वेदांचे मिश्रण आहे, कथा श्रवणाने कलयुगाचा नाश होतो, चित्त एकाग्र बनते, कानी पडणारे कथेतील प्रत्येक शब्द मंत्र स्वरूप असतात, कथा श्रवणाने सर्व दुःख, अडचणी नष्ट होतात. कथेचे श्रवण म्हणजे अमृतपान करण्यासारखे असल्याचे राधाकृष्णजी महाराज म्हणाले.

प्रत्येकाच्या घरात सासूचे सुनेशी, पतीचे पत्नीशी, वडिलांचे मुलांशी अशी भांडणे सुरू असतात की जसे ते एखाद्या युद्धाची ट्रेनिंग घेत आहेत. अशा परिस्थितीत कुटुंबात प्रेमभाव कसा निर्माण होईल? असा प्रश्न यावेळी राधाकृष्णजी यांनी उपस्थित केला. भागवताचा एक अथवा अर्धा श्लोक जरी मुखोद्गत अथवा पठण केलातरी एक हजार गोदानाचे पुण्य प्राप्त होते, असा उल्लेख कुनती स्तुतीच्या मंगलाचरणात आहे, असे ते म्हणाले.

याप्रसंगी महाराजांनी सादर केलेल्या 'भोलेनाथ की जटा मे गंगा प्यारी लगे' या भजनावर भाविकांनी ठेका धरला. कथेला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मंडप खचाखच भरलेला होता. पहिल्याच दिवशीच मोठा प्रतिसाद मिळाला. भक्तांचा महासागरच जणू त्या ठिकाणी जमला होता. वातावरण भक्तिमय होतं आणि सर्वत्र भगवंताच्या नामस्मरणाचे स्वर घुमत होते. कथा ऐकण्यासाठी आलेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भक्तीभाव झळकत होता.

सामाजिक बांधिलकी म्हणून कथास्थळी दररोज माहेश्वरी युवा संघटनच्यावतीने व जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिर, जालना जनसेवा ग्रुप व विक्रम टी कंपनीतर्फे चहा तर सिंधी समाजातर्फे अल्पोपहार सेवा आदी सेवाभावी उपक्रम राबविले जाणार आहेत.

शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

## जालन्याच्या पालकमंत्री ...

पालघर - गणेश सुभद्रा रामचंद्र नाईक
जळगांव - गुलाबराव रेवाबाई रघुनाथ पाटील
यवतमाळ - संजय प्रमिला दुलिचंद राठोड
मुंबई उपनगर - ॲड. आशिष मिनल बाबाजी शेलार
मंगलप्रभात प्रेमकंवर गुमनमल लोढा (सह-पालकमंत्री
रत्नागिरी - उदय स्वरुपा रविंद्र सामंत
धुळे - जयकुमार नयनकुवर जितेंद्रसिंह रावल
नांदेड - अतुल लिलावती मोरेश्वर सावे
चंद्रपूर - डॉ. अशोक जनाबाई रामाजी उईके
सातारा - शंभूराज विजयादेवी शिवाजीराव देसाई
रायगड - आदिती वरदा सुनिल तटकरे
लातूर - शिवेंद्रसिंह अरुणाराजे अभयसिंहराजे भोसले
नंदूरबार - ॲड. माणिकराव सरस्वती शिवाजी कोकाटे
सोलापूर - जयकुमार कमल भगवानराव गोरे
हिंगोली - नरहरी सावित्रीबाई सीताराम झिरवाळ
भंडारा - संजय सुशीला वामन सावकारे
छत्रपती संभाजीनगर - संजय शंकुतला पांडुरंग शिरसाट
धाराशिव - प्रताप इंदिराबाई बाबुराव सरनाईक
बुलढाणा - मकरंद सुमन लक्ष्मणराव जाधव (पाटील)
सिंधुदुर्ग - नितेश निलम नारायण राणे
अकोला - आकाश सुनिता पांडुरंग फुंडकर
गोंदिया - बाबासाहेब शांताबाई मोहनराव पाटील
कोल्हापूर - श्री. प्रकाश सुशीला आनंदराव आबिटकर
श्रीमती माधुरी मीरा सतिश मिसाळ (सह-पालकमंत्री)
वर्धा - डॉ. पंकज कांचन राजेश भोयर
परभणी - श्रीमती मेघना दीपक साकोरे-बोर्डीकर

## युवक-युवतींसाठी इस्राईल देशात होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर वर्कस म्हणून रोजगाराची संधी

**जालना । प्रतिनिधी** - आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासह बांधकाम, आरोग्य व इतर क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर शासनाकडून भर देण्यात येत आहे. जालना जिल्ह्यातील २५ ते ४५ वयोगटातील पात्राताधारक उमेदवारांना इस्राईलमध्ये नोकरीची संधी मिळणार आहे. यासाठी होम बेस्ड हेल्थ केअर गिव्हर्स म्हणून काम करण्यास इच्छुक उमेदवारांनी https://maharashtrainternational.com/jobDetail.aspxm लिंकवर उमेदवारांनी नोंदणी करावी. असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले.

## उर्दू वाचन अभियान टप्पा २ अंतर्गत जाफ्राबाद तालुकास्तरीय प्रशिक्षण संपन्न



**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** तालुक्यातील उर्दू माध्यमच्या सर्व जि.प. व खाजगी शाळेतील सर्व शिक्षकांचे उर्दू वाचन प्रशिक्षण टप्पा क्र २.० चे एकदिवसीय प्रशिक्षण जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळा , अंदरून किल्ला जाफ्राबाद येथे दिनांक १७/०१/२०२५ रोजी संपन्न झाले. सकाळी ०९:३० ते १०:४५ या वेळेत मुलांना शालेय पोषण आहार वाटप करुन सकाळी ११:१५ ते ०४:०० या वेळेत प्रशिक्षणासाठी तालुक्यातील सर्व उर्दू माध्यमाच्या शाळांच्या शिक्षकांनी उपस्थित राहुन सदर प्रशिक्षण घेतले. या सर्व शिक्षकांना रिसोर्स पर्सन शेख नजमुद्दीन, शेख साबेर, शेख तमिजुद्दीन आणि सिद्दिकी शकील एजाज यांनी उर्दू वाचन प्रशिक्षण टप्पा क्र २.० प्रोग्राम चे प्रशिक्षण दिले प्रशिक्षण दिले. यावेळी उपस्थित सर्व शिक्षकांनी उत्साह दाखवित अगदी खेळीमेळीच्या वातावरणात प्रशिक्षण घेतले. सुरुवातीला कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे नारायण पिंपळे यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना शुभेच्छा देत उर्दू वाचन प्रशिक्षण टप्पा क्र २.० याचे महत्त्व पटवून दिले यानंतर प्रशिक्षणात उपस्थित तालुक्यातील सर्व उर्दू शाळेतील मुख्याध्यापकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.पाच तास चाललेल्या या प्रशिक्षणात शिक्षकांनी उर्दू वाचन प्रशिक्षण टप्पा क्र २.० चे सविस्तर प्रशिक्षण घेतले. यावेळी जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक हबीब मोहम्मद अजीलानी यांची विशेष उपस्थिती होती.

# भारतभूषण कै.रावसाहेबजी जामकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे २२ रोजी आयोजन

**परभणी । प्रतिनिधी -** नूतन विद्यामंदिर शिक्षण संस्था,परभणी भूतपूर्व अध्यक्ष, शिक्षण महर्षी,माजी मंत्री भारतभूषण रावसाहेब जामकर यांचे स्मृतिप्रीत्यर्थ कै.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय,परभणी वाङ्मय मंडळाचे वतीने भारतभूषण कै.रावसाहेबजी जामकर राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा सन २०२४-२५ ( वर्ष १६ वे ) औचित्य साधत 'एक राष्ट्र एक निवडणूक' या विषयावर २२जानेवारी २०२५ रोजी ही स्पर्धा संपन्न होणार आहे.

सदरील स्पर्धेचे सकाळी १० वाजता कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, जिंतूर रोड,परभणी येथे मा.श्री.हेमंतराव जामकर अध्यक्ष,नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी यांचे हस्ते उदघाटन होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ड.किरणराव सुभेदार उपाध्यक्ष,नूतन विद्या मंदिर शिक्षण संस्था,परभणी यांची तर प्रमुख पाहुणे डॉ.राजशेखर सोलापूरे सुप्रसिद्ध व्याख्याते, आणि लेखक यांची उपस्थिती असणार आहे. व्यासपिठावर प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले सह आदी मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.



या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील वरिष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास सहभाग नोंदवता येईल.स्पर्धकाने सोबत महाविद्यालयाचे संमती पत्र आणि ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.स्पर्धकाला प्रत्येकी ५+२ एकुण ७ मिनिटे वेळ देण्यात येणार आहे. स्पर्धकाला आपला विषय मराठी अथवा हिंदी भाषेतून मांडता येईल. स्पर्धे साठी प्रवेश शुल्क १०० रुपये असून,स्पर्धकाने एक तास आधी पर्यंत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल.परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

स्पर्धेसाठीचे प्रथम पारितोषिक रुपये ५००० सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र. द्वितीय पारितोषिक रुपये ३००० सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र. तृतीय पारितोषिक रुपये २००० सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र .उत्तेजनार्थ पारितोषिक दोन, प्रत्येकी १००० रुपये सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र.विजेत्यांना मान्यवरांचे हस्ते पारितोषिके प्रदान केले जाणार आहेत.

तरी या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंतराव भोसले,वाङ्मय विभाग,संयोजन समीती च्या वतीने करण्यात आले आहे.

नोंदणीसह अधिक माहिती साठी डॉ.संगीता आवचार उपप्राचार्य मोबा.९७६७३२३२९०., डॉ. आशा गीरी मोबा. ९७६६९२४६६६., डॉ. संगीता लोमटे मोबा.९४०५३४३७०६., डॉ. ओमप्रभा लोहकरे मोबा ९९७५१०८२०४., डॉ. नसिम बेगम मोबा ९९६०४६१४८१., प्रा. निर्मला जाधव मोबा.७९७२२६०९८३., प्रा. अरुण पडघन मोबा. ८३२९४००४९७ यांचे शी संपर्क साधावा.

# नागरी सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्याची माजी नगरसेवकांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासह मोकाट कुत्रे आणि जनावरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जालना शहरातील माजी नगरसेवक शेख शकील लालमिया, मोहम्मद नजीब, फारूख तुंडीवाले, सय्यद अझहर आणि अमजद खान यांनी जालना महानगर पालिकेच्या आयुक्त श्रीमती प्रियंका राजपूत यांची भेट घेऊन केली. या भेटीत त्यांनी नागरिकांच्या समस्या व तक्रारी मांडत विविध मागण्या केल्या.

माजी नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने विविध प्रश्नांकडे लक्ष वेधले. प्रामुख्याने मोकाट कुत्र्यांमुळे निर्माण झालेल्या समस्या व त्यावरील तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली. दोन दिवसांपूर्वी मोकाट कुत्र्याने माय-लेकीला चावा घेतल्याची घटना घडली आहे, ज्यामुळे परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासह मोकाट जनावरांमुळे होणाऱ्या घटनांवरही नियंत्रण मिळवण्याची मागणी करण्यात आली आहे.

मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना राबवण्यात यावी. रस्त्यांवर मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करण्यासाठी योग्य पावले उचलावीत, शहराच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देऊन नियमित स्वच्छता मोहीम राबवावी, स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न करावेत, जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठी नागरिकांकडून वयाच्या अनुसार १०० रुपये आणि जास्त काळ उलटला तरी २०० ते ३०० पेक्षा जास्त शुल्क आकारू नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## गोंदी येथे अवैध वाळू उपसा केल्याप्रकरणी १५ जणांवर गुन्हे दाखल

**जालना । प्रतिनिधी** - अंबड तालुक्यातील गोंदी येथे अवैध वाळू उपसा केल्याप्रकरणी १५ जणांवर गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आलेत. महसूल पथकाने गोंदी येथील सिद्धेश्वर पॉईंट जवळील गोदावरी नदीपात्रात अचानक पाहणी केली. यावेळी गोदावरी नदीपात्रातून अवैधरीत्या वाळूचे उत्खनन व वाहतूक केल्याच महसूल पथकाच्या निदर्शनास आलं. त्यावरून नायब तहसीलदार विवेक उढाण यांच्या फिर्यादीवरून काल दिनांक १६ गुरुवार रोजी गोंदी पोलीस ठाण्यात अवैधरित्या वाळू चोरी केल्याप्रकरणी १५ जणांविरुद्ध गोंदी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत

# सिद्धार्थ महाविद्यालयामध्ये ग्रंथ प्रदर्शन

**जाफराबाद । प्रतिनिधी** - येथील सिल्लोड शिक्षण संस्था छ. संभाजी नगर संचालित सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जाफराबाद या महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा व मराठी भाषा संवर्धन पंधरवडा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालय विभागात भव्य दिव्य असे ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते,या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देशमुख आर. टी यांच्या शुभहस्ते करण्यात आले आपल्या उद्घाटनपर भाषणात प्राचार्य डॉ देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी वाचनाकडे लक्ष देणे आवश्यक आहे,वाचन हा व्यक्तीच्या आयुष्यात अविभाज्य घटक आहे विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त पुस्तके वाचावीत व आपले ज्ञान भांडार समृध्द करावे असे आवाहन केले

कार्यक्रमाचं सूत्रसंचालन वाचन संकल्प महाराष्ट्राच्या या उपक्रमाचे समन्वय प्रोफेसर डॉ. विजय पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक प्रा. एस. टी. साळवे व्यक्त केलेत याप्रसंगी महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. एस. एल. मेढे,कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विनोद हिवराळे प्रा. डॉ. कैलास पाटील प्रा. डॉ एस.डी.एरंडे,प्रा. डॉ एस. पी. जगतवाड, प्रा. अनिल वैद्य यांनी सहभाग नोंदविला विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेऊन वाचन संस्कृती संवर्धना बरोबरच भाषेचाही उत्कर्ष करू अशी हमी दिली.

महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अशोक पठाडे व त्यांचे सर्व सहकारी धनराज भिसे, गफार खान, दिलीप घुगे, कृष्णा ठोसर , अण्णासाहेब घोडके यांनी ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.




## मंठ्यातील जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

### कारवाईत १ लाख ३४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी** - मंठा येथील जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकलाय. या कारवाईत मंठा पोलिसांच्या पथकाने १ लाख ३४ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केलाय. या प्रकरणी ८ जणांविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आलाय. मंठा शहरात सार्वजनिक ठिकाणी काही इसम गोलाकार बसून मटका जुगार खेळ खेळत असल्याची मंठा पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार काल दिनांक १६ गुरुवार रोजी पोलिस पथकाने सदर ठिकाणी छापा मारून ८ जणांना जुगार खेळताना रंगेहाथ पकडले. या कारवाईत पोलिसांनी ८ हजार ९२० रुपये रोख, मोबाइल, दुचाकी व जुगाराचे साहित्य असा एकूण १ लाख ३४ हजार २२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आठ जणांविरुद्ध मंठा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केलाय.

# जिल्हा परिषद प्रशाला दत्तनगर मराठी विभाग व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी योगेश गडकर



**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - येथील जिल्हा परिषद प्रा शाळा दत्तनगर टेंभुर्णी येथे शालेय व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली यावेळी उपस्थित संजय गांधी निराधार समिती सदस्य व ग्रा˙ सदस्य मा श्री किशोर भाऊ कांबळे पोलीस स्टेशनचे कर्मचारी गणेश खाडी साहेब मुख्याध्यापक मीना जामदार मॅडम, संध्या लोखंडे मॅडम, अश्विनी उगले मॅडम, श्रीकृष्ण आव्हाळे सर बापू देशमुख गणेश उकडे सचिन पंडित शंकर मसूद भाई शहा आधी पालकांच्या व मातेच्या उपस्थितीत शालेय व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली अध्यक्षपदी श्री योगेश गडकर यांची निवड करण्यात आली व उपाध्यक्षपदी सौ. मिराताई भालेराव व सदस्यपदी. प्रदीप भाऊ कांबळे असलम पठाण संतोष धारे नसीम का पठाण मनोज दांडगे मसुदा भाई शहा जाकीर खान विष्णू गोफणे फारुख शहा शंकर सोनसळे व सर्व पालकांचे वतीने नवीन गठीत झालेल्या शालेय समितीचे अभिनंदन करण्यात आले

# मो.अली जोहर उर्दू शाळेत आनंदनगरी उत्साहात साजरी

**सेवली । प्रतिनिधी** - येथे मोहम्मद अली जोहर उर्दू शाळेत आनंदनगरी, कॅन्टीन डे अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.



याप्रसंगी या आनंदनगरीचे उदघाटन सेवली केंद्रीय शाळेचे केंद्रप्रमुख श्री चव्हाण यांच्या हस्ते तसेच सेवली ग्रामपंचायतचे सरपंच आदिल खान यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले विद्यार्थ्यांमध्ये भविष्यात प्रत्येक वळणावर व्यवहार आणि कृतीशिक्षण यांची रुजवणूक व्हावी हा हेतू समोर ठेवून प्रजासत्ताक सप्ताहनिमित्त या शाळेत विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी कॅन्टीन डे आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येत या कार्यक्रमात सहभाग नोंदविला विविध सुरुची खाद्य पदार्थांचे सुंदर स्टॉल लावण्यात आले होते तसेच उर्वरित विद्यार्थ्यांनी व पालकांनी उत्तम प्रतिसाद देत सदरील खाद्य साहित्य अतिशय आनंदाने खरेदी केले. आपल्याला भावी जीवनात नफा तोटा तसेच आर्थिक व्यवहारात शिक्षणाचा काय फायदा होतो हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आले .अनुभवातून शिकता येते हे विद्यार्थ्यांना शिकण्यास मिळाले.

यात्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक शेख इरफान शिक्षक साजिद खान , शेख अकबर,अयाज खान ,शेख रफिक अरिफ शेख , राजीक खान,कलीम खान ,आर पी चव्हाण तसेच ग्रामपंचायत सदस्य फरहान अन्सारी नाझीम शाह , संपादक अकबर अन्सारी.पत्रकार तथा पालक जरीन खान, पत्रकार शेख जावेद तसेच मोठ्या संख्येने पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांचे हस्ते महारेशीम अभियानाची सुरुवात




**जालना । प्रतिनिधी** - सन २०२५-२६ मध्ये तुती लागवड समुहात मनरेगा, सिल्क समग्र-२ योजने अंतर्गत तसेच वैयक्तीक नविन तुती लागवड करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी दि. ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत जिल्ह्यात महा-रेशीम अभियान २०२५ राबविण्यात येत आहे. या अनुषंगाने जिल्ह्यात महारेशीम अभियान २०२५ च्या रथास जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांचे हस्ते आज (दि.१७) रोजी हिरवी झेंडी दाखवुन सुरुवात करण्यात आली.

यावेळी रेशीम विकास अधिकारी श्री. मोहिते यांच्यासह शेतकरी बांधव आणि इतर अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

# पाटी एकांकिकेने पटकाविला राज्यस्तरीय अटल करंडक

## गौरव रंगभूमीचा पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी सतीश पुळेकर यांचा सन्मान

**पनवेल । प्रतिनिधी** - श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व चांगू काना ठाकूर महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धेत मुंबईच्या एकदम कडक नाट्य संस्थेच्या 'पाटी' एकांकिकाने सर्वोत्कृष्ट कामगिरी करत अटल करंडकवर आपले नाव कोरले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष, महापालिकेचे माजी सभागृह नेते व अटल करंडक स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, सिने व नाट्यनिर्मात्या कल्पना कोठारी, सुप्रसिद्ध अभिनेत्री सुकन्या मोने, सुप्रसिद्ध दिग्दर्शक देवेंद्र पेम, विराजस कुलकर्णी, ज्येष्ठ अभिनेते जयवंत वाडकर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, 'ब्रँड ॲम्बेसिडर अभिनेत्री रुचिरा जाधव, प्राथमिक फेरीचे परीक्षक आशीर्वाद मराठे, मानसी मराठे यांच्या उपस्थितीत एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक प्रदान करून त्यांना गौरविण्यात आले.तसेच या स्पर्धेच्या अनुषंगाने महत्वपूर्ण अशा यंदाच्या गौरव रंगभूमीचा पुरस्काराने ज्येष्ठ रंगकर्मी सतीश पुळेकर यांचा गौरव करण्यात आला. पनवेल येथील आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेच्या महाअंतिम फेरीचे पारितोषिक वितरण झाले.

या राज्यस्तरीय स्पर्धेत एकाहून एक सरस अशा एकांकिका सादर झाल्याने बहुमानाचा अटल करंडक यंदा कोण पटकावणार याची उत्सुकता संपूर्ण महाराष्ट्राला लागली होती. अखेर या स्पर्धेत सर्वोत्तम ठरलेल्या 'पाटी' एकांकिकाचे नाव जाहीर होऊन त्यांना अटल करंडक विजेता बहुमान मिळाला. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक क्राउड नाट्य संस्थेच्या 'चिनाब से रावी तक' (७५ हजार रुपये,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह); तृतीय क्रमांक कलांश थियटर्स च्या 'क्रॅक इन द मिरर' (५० हजार रुपये,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), चतुर्थ क्रमांक एम. डी. कॉलेजच्या 'ब्रम्हपुरा' (२५ हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह)तर उत्तेजनार्थ सतीश प्रधान ज्ञानसाधना ठाणे (१० हजार रुपये,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह) यांच्या 'कुक्कुर' आणि कलादर्शन पुणे यांच्या 'बॉईल्ड शुद्ध शाकाहारी' (१० हजार रुपये,प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह) या एकांकिकांनी पटकाविले. सर्वोत्कृष्ट विनोदी एकांकिका गुरुनानक खालसा कॉलेजची जुगाड लक्ष्मी एकांकिका ठरली. राज्यातून १०८ एकांकिकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अंतिम फेरीसाठी राज्यातून निवड झालेल्या २५ एकांकिकांचे सादरीकरण झाले.

उत्कृष्ट आयोजन व नियोजन, भरघोस रक्कमेचे पारितोषिके, ज्येष्ठ कलाकारांचे मार्गदर्शन आणि संधी यांचे मिलाप असलेल्या या स्पर्धेतून आजवर अनेक कलाकार घडले आहेत. नाटय चळवळ वद्धींगत व्हावी व नाटय रसिकांना आपले नाटयाविष्कार प्रदर्शित करता यावे, त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, तसेच देशाच्या विकासासाठी सदैव धडपडणारे भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या विचारांचा वारसा वद्धींगत व्हावा, यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृहनेते व नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष परेश ठाकूर यांनी 'अटल करंडक एकांकीका' या दर्जेदार स्पर्धेचा प्रारंभ केला. नामवंत, उमदे आणि हौशी कलावंत या स्पर्धेकडे नेहमीच आकर्षित होतात. स्पर्धेचे देखणे व निटनेटके संयोजन, आकर्षक पारितोषिके, दर्जेदार परिक्षण आणि सर्वोत्तम स्पर्धास्थळ यामुळे ही स्पर्धा नाट्य रसिकांच्या गळयातील ताईत बनली. दरवर्षी या स्पर्धेला राज्यातील कलाकार आणि प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभत असतो. त्यामुळे हि स्पर्धा राज्यात नावाजली असून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना यंदाही भरघोस रक्कमेची पारितोषिके देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेचे प्रायोजक ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रा. लिमिटेड तर सहप्रायोजक नील ग्रुप आणि स्थळ प्रायोजक पनवेल महानगरपालिका हे होते. हि स्पर्धा यशस्वी होण्यासाठी स्पर्धा प्रमुख परेश ठाकूर, नाट्य परिषद पनवेल शाखा प्रमुख कार्यवाह श्यामनाथ पुंडे, कोषाध्यक्ष अमोल खेर, भाजप सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, समन्वयक गणेश जगताप, चिन्मय समेळ, वैभव बुवा, कोमल पाटील, दिव्या शेट्ये आणि टीम अटल करंडक, सीकेटी कॉलेज आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे स्वयंसेवक यांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेला नाट्य संस्था, कलाकार आणि रसिक प्रेक्षकांचा उदंड प्रदिसाद लाभला.




**पारितोषिके खालीलप्रमाणे -**

सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक : प्रथम क्रमांक संकेत/ संदेश (चिनाब से रावी तक ) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; द्वितीय रोहित/ रोहन कोतेकर (ब्रम्हपुरा ) १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय अजय पाटील (कुक्कुर ) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ किरण माने/ नितेश जाधव (बॉडी ऑफ नरेवाडी ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ विनोद रत्ना (बॉईल्ड शुद्ध शाकाहारी ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

सर्वोत्कृष्ट अभिनेता : प्रथम क्रमांक औदुंबर बाबर- 'पाटी',(दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह); द्वितीय महेश कापरेकर-'क्रॅक इन द मिरर' ( १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय क्रमांक अनिल आव्हाड- 'गुडबाय किस' (एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ परीन मोरे - 'वेदना सातारकर हाजीर सर ' (५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), उत्तेजनार्थ दिव्येश इंदुलकर - 'जुगाड लक्ष्मी' (५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), उत्तेजनार्थ सौमित्र कागलकर - व्हाय नॉट (५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह), उत्तेजनार्थ रितेश आफ्रे - सर्पसत्र (५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह),

सर्वोत्कृष्ट अभिनेत्री : प्रथम क्रमांक ऋतुजा बोठे 'बॉईल्ड शुद्ध शाकाहारी' -दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; द्वितीय विजय गुंडव 'पाटी' १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय श्रावणी ओव्हाळ 'अविद्यनेया'- एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ प्रतीक्षा देवकाते 'पाटी' ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ आस्था टाळे- ' गुडबाय किस' ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह,

सर्वोत्कृष्ट लेखक : प्रथम क्रमांक दीपक बिरारी ( -'क्रॅक इन द मिरर') दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; द्वितीय राकेश जाधव (गुड बाय किस ) १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय अजय पाटील (कुक्कुर) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ विनोद रत्ना (बॉइल्ड शुद्ध शाकाहारी) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ गंधार जोग (कलम ३७५) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

सर्वोत्कृष्ट नेपथ्य : प्रथम क्रमांक देव आशिष/ राहुल ( चिनाब से रावी तक ) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; द्वितीय सिद्धेश नांदलस्कर (कुक्कुर) १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय यश पवार (ब्रम्हपुरा ) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ ऋतुजा बोठे (बॉईल्ड शुद्ध शाकाहारी ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ रोहित/ तिथी (गुडबाय किस ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना : आकाश पांचाळ (चिनाब से रावी तक) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; द्वितीय साई शिरसेकर (गुडबाय किस) १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय सिद्धेश नांदलस्कर (कुक्कुर) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ निखिल मारणे (देव बाप्पा) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ श्याम चव्हाण (ब्रह्मपुरा ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

सर्वोत्कृष्ट संगीत : गणेश जगताप (वेदना सातारकर हाजीर सर ) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; द्वितीय प्रणव घोडे (बॉईल्ड शुद्ध शाकाहारी) १५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; तृतीय संकल्प झोटे (ब्रम्हपुरा) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह; उत्तेजनार्थ अक्षय धांगर (कुक्कुर ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह, उत्तेजनार्थ रोहन पटेल (गुडबाय किस ) ५०० रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

उत्कृष्ट वेशभूषा (कै. किशोर जोशी यांच्या स्मरणार्थ) : ब्रह्मपुरा (एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह)

उत्कृष्ट विनोदी कलाकार : विनोद चंदनशिव (बॉइल्ड शुद्ध शाकाहारी ) दोन हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

उत्कृष्ट बालकलाकार : वज्रेश्वरी (पसायदान ) एक हजार रुपये, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह

### माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्या पाठपुराव्यास यश!

# कुंभमेळ्यासाठी मराठवाड्यातील भाविकांना विशेष रेल्वेची सुविधा

**जालना । प्रतिनिधी -** बारा वर्षांनी येणाऱ्या हिंदू धर्मातील पवित्र महाकुंभ पर्वासाठी जाण्याकरिता मराठवाड्यातील भाविकांना विशेष रेल्वे उपलब्ध करावी अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे नेते, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनीकुमार वैष्णव यांच्याकडे केली होती. त्या अनुषंगाने रेल्वेमंत्री यांनी विशेष रेल्वे गाड्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.



प्रयागराज ( उत्तर प्रदेश )येथील कुंभ मेळाव्यात जाण्याकरीता नांदेड-पटणा-नांदेड, औरंगाबाद-पटणा-औरंगाबाद , काचीगुड-पटणा-काचीगुडा आणि सिकंदराबाद-पटणा-सिकंदराबाद विशेष रेल्वे प्रयागराज छिवकी मार्गे चालविण्यात येत आहेत. यात

गाडी क्रमांक ०७७२१ नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी रात्री ११.०० वाजता सुटेल पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७७२२ पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक २४ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०३.३० वा. सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक २६ जानेवारी रोजी सकाळी ०४.३० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील. गाडी क्रमांक ०७७२५ काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी दुपारी ०४:४५ वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, जबलपूर, इटारसी, पिपरिया, जबलपूर, काटणी, संटणा, माणिकपूर, प्रयागराज चौकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बकसर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७७२६ पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे सकाळी ०७:०० वा.पोहोचेल. गाडी क्रमांक ०७०९९ नांदेड ते पटणा ही विशेष गाडी नांदेड येथून दिनांक १३ फेब्रुवारी २०२५ रोजी रात्री ११.०० वाजता सुटेल आणि पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर,जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७१०० पटणा ते नांदेड विशेष गाडी पटणा येथून दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच नांदेड येथे दिनांक १७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०४.३० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.

गाडी क्रमांक ०७१०१ औरंगाबाद-पटणा ही विशेष गाडी औरंगाबाद येथून दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ आणि २५ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ०७.०० वा. सुटेल आणि जालना, सेलू ,परभणी,पूर्णा, बसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर,जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७१०२ पटणा ते औरंगाबाद विशेष गाडी पटणा येथून दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ आणि २७ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच औरंगाबाद येथे अनुक्रमे दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ आणि दिनांक २९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ०७.४५ वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.

गाडी क्रमांक ०७१०३ काचीगुडा ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी काचीगुडा येथून दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०४:४५ वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर, खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७१०४ पटणा ते काचीगुडा मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच काचीगुडा येथे दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ सकाळी ०७:०० वाजता पोहोचेल. या गाडीत २२ डब्बे असतील.

गाडी क्रमांक ०७१०५ सिकंदराबाद ते पटणा मार्गे नांदेड ही विशेष गाडी सिकंदराबाद येथून दिनांक ०७ फेब्रुवारी २०२५ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजता सुटेल आणि निजामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, वसमत, हिंगोली, वाशिम, अकोला, मलकापुर,खंडवा, इटारसी, पिपरिया, नरसिंहपूर, जबलपूर, कटनी, मैहर, सतना, माणिकपूर, प्रयागराज छिवकी, पंडित दीनदयाळ उपाध्याय जंक्शन, बक्सर, आरा, दानापुर मार्गे पटणा येथे तिसऱ्या दिवशी सकाळी १०.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०७१०६ पटणा ते सिकंदराबाद मार्गे नांदेड ही विशेष गाडी पटणा येथून दिनांक ०९ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ०३:३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच सिकंदराबाद येथे दिनांक ११ फेब्रुवारी २०२५ सकाळी ११:३० वाजता पोहोचेल. या गाडीत २० डब्बे असतील. असे सांगून भाविकांनी मोठ्या संख्येने या सेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन रावसाहेब दानवे यांनी केले आहे.

### आरक्षण सुविधेने प्रवास सुखकर होईल - भास्कर दानवे

प्रयागराज येथे महाकुंभ पर्वात कोट्यावधी हिंदू भाविकांना गैरसोय होऊ नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, आणि उत्तर प्रदेश चे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली केंद्र आणि राज्य शासनाने काटेकोर नियोजन केले असून देशाच्या विविध भागातील भाविकांना प्रयागराज येथे पोहोचण्यासाठी विशेष रेल्वे गाड्या सोडल्या जात आहेत. मराठवाड्यातील भाविकांना दि. २२ जानेवारी ते २२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत रेल्वे गाड्या टप्प्या- टप्प्याने जाणार आहेत. प्रवासात अडचणी येऊ नये यासाठी रेल्वे विभागातर्फे आगाऊ आरक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेमुळे भाविकांचा प्रवास सुखकर होईल. असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे जालना विधानसभा प्रमुख भास्करराव पाटील दानवे यांनी व्यक्त केला. तथापि भाविकांनी नियोजन करून सर्व सुविधांचा लाभ घ्यावा असे आवाहन भास्करराव पाटील दानवे, रेल्वेचे विभागीय सल्लागार अर्जुन गेही, जालना स्थानक सल्लागार समितीचे प्रा. राजेंद्र भोसले, ममता कोंड्याल, शिवराज जाधव, बाबुराव भवर यांनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.